**<u>रे.दि.मु.नं. ८२/२०१२ मधील नि. ३७ खालील आदेश</u>**

रविंद्र बाबूराव सोनावणे व इतर ....... वादी

वि.

मोहन गणपतराव देडे व इतर ....... प्रतिवादी

**१.** प्रस्तूतचा अर्ज यातील प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमध्ये दुरूस्ती करण्यासाठी दिलेला आहे. सदर अर्जात वादीने नि. ३९ वर म्हणणे दिले आहे. वादीचे कथन असे आहे की, प्रतिवादीने दुरूस्ती अर्जात केलेले कथन हे प्रतिवादींना पुर्वीच माहित होते, परंतु त्यांनी दावा दाखल करताना नमुद केलेले नाही. प्रतिवादी १० ते १२ वर्षानंतर दुरूस्ती मागत आहेत.

**२.** दोन्ही वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत नि. ३७ च्या अर्जात नमूद केलेल्या दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होत नाही. तसेच प्रतिवादींच्या बचावामध्ये बदल होत नाही. त्यामुळे प्रस्तूत अर्जात नमूद केलेली दुरूस्ती मंजूर करणे योग्य वाटते. सबब, नि. ३७ चा कैफियत दुरूस्ती अर्ज मंजूर करण्यात येतो. यातील प्रतिवादीने यातील वादींना खर्चापोटी र.रू. १,०००/- द्यावे. प्रतिवादींनी सदरची दुरूस्ती विहित कालावधीमध्ये करावी.

**खंडाळा** **(डि.एम.गिरी )**
**दिनांकः २३/०८/२०१९** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, खंडाळा**